# प्रेसनोट

दिनांक– ३१/०८/२०१८.

## अंबरनाथ नगरपरिषद येथील लिपीक यांचेविरुध्द् लाचेची मागणी केल्यावरून गुन्हा दाखल.

दिनांक ३१/०८/२०१८ रोजी, जन्म मृत्यु नोंदणी विभाग, अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ येथील लिपीक, **दिपक तुळशिराम बोरसे** यांच्याविरुध्द् तक्रारदार यांच्याकडे १,२००/– रुपये लाचेची मागणी केल्यावरुन अंबरनाथ पोलीस स्टेशन, ठाणे शहर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याबाबत थोडक्यात हकिगत खालीलप्रमाणे.

यातील तक्रारदार यांना विवाह प्रमाणपत्र देण्यासाठी वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे १,२००/– रुपये लाचेची मागणी केली होती. सदरबाबत तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, कॅम्प पालघर यांच्याकडे तक्रार नोंदवली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी केली असता, नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यावरून, अे.सी.बी. कॅम्प पालघर यांनी त्यांचेविरूध्द् लाचेचा सापळा आयोजीत केला होता. परंतू लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारली नाही म्हणून लोकसेवक **दिपक तुळशिराम बोरसे** यांच्याविरूध्द लाचेची मागणी केल्यावरून भ्रष्टाचार प्रतिबंधक (संशोधन) अधिनियम सन २०१८ चे कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, गुन्हयाचा पुढील तपास श्री.महेंद्र वाघमारे, पोलीस निरीक्षक, अेसीबी, पालघर हे करत आहेत.

**शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयास खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.**

---

१) टोल फ्री क्र. :- **1064**
२) दुरध्वनी क्रमांक :- **022–25427979**
३) ई–मेल आयडी :- **spacbthane@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट :- **www.acbmaharashra.gov.in**

Scanned by CamScanner